## भोंदू खरातची पत्नी कल्पना खरात अखेर शिर्डी पोलिस ठाण्यात हजर

अहिल्यानगर : मोठी बातमी समोर आली आहे. भोंदू अशोक खरातची पत्नी कल्पना खरातने अखेर शिर्डी पोलिस ठाण्यात हजेरी लावली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून कल्पना खरात फरार होती, सुप्रीम कोर्टाकडून अंतरिम जामीन मिळाल्यानंतर कल्पना शिर्डी पोलिस ठाण्यात हजर झाली. शिर्डीतील शेतकऱ्याची जमीन व्यवहारात फसवणूक प्रकरणी अशोक खरातसह कल्पना खरातवर दाखल गुन्हा दाखल आहे.


# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


## पहिल्यांदाच लाल किल्ल्यावरून राष्ट्रगीत गायले जाणार

**नवी दिल्ली :** सर्व भारतीयांसाठी अभिमानाचा क्षण मानला जाणाऱ्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी, पंतप्रधान नरेंद्र मोदी लाल किल्ल्यावर दाखल होतात व तिरंग्याचे ध्वजारोहण करतात. परंतु या वर्षी प्रथमच किल्ल्याच्या तटबंदीवरून राष्ट्रगीत म्हणजेच 'वंदे मातरम' गायले जाणार आहे. तसेच, या सोहळ्यात तरुण विद्यार्थी आणि 'जनरेशन झेड' सदस्यांना अधिक प्रतिनिधित्व मिळेल, ज्यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना तटबंदीवर बसवले जाईल. संरक्षण सचिव 'राजेश कुमार सिंह' यांनी सोमवारी (१० ऑगस्ट, २०२६) रोजी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी घेतलेल्या या राष्ट्रगीत गायनाच्या निर्णयाला विशेष महत्त्व आहे.


छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ११५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## थोडक्यात वार्ता

### कलम 163 लागू; बळजोरीने पैशांची मागणी करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल होणार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील लग्नसोहळे, सण-उत्सव, धार्मिक कार्य किंवा जन्म-मृत्यूच्या प्रसंगी तसेच रहदारीचे रस्ते आणि ट्रॅफिक जंक्शनवर नागरिकांना आणि वाहनचालकांना नाहक त्रास देऊन बळजोरीने पैशांची मागणी करणाऱ्यांच्या विरोधात पोलीस प्रशासनाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. या प्रकारांना वेळीच आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित केले आहेत. शहरात मागील काही काळापासून विविध समारंभांमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी काही गट आणि प्रामुख्याने तृतीयपंथी मंडळी एकट्याने किंवा समूहाने जाऊन पैशांची मागणी करत असल्याच्या तक्रारी समोर येत होत्या. विशेषतः ट्रॅफिक सिग्नलवर किंवा रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालक व प्रवाशांना अडवून पैसे देण्यासाठी दबाव टाकण्याचे प्रकार वाढले होते. या प्रकारामुळे सामान्य नागरिकांना आणि विशेषतः महिला व वाहनचालकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत होता. याची गंभीर दखल घेत पोलीस प्रशासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नवीन आदेशानुसार, छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालय क्षेत्रामध्ये आगामी दोन महिने म्हणजेच १३ ऑगस्ट ते ११ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हे प्रतिबंधात्मक आदेश लागू राहणार आहेत. या कालावधीत कोणीही व्यक्ती किंवा गट कोणत्याही समारंभाच्या ठिकाणी किंवा सार्वजनिक रस्त्यांवर नागरिकांना आणि वाहनचालकांना वेठीस धरून बळजोरीने पैशांची वसुली करू शकणार नाही.

### लेहमध्ये 5.5 रिश्टर स्केलचे हादरे, नागरिकांमध्ये घबराट

**लेह :** लडाखमधील लेह शहराला गुरुवारी पहाटे भूकंपाचा जोरदार धक्का बसला. सकाळी सुमारे ६ वाजून ५ मिनिटांनी भूकंपाचे तीव्र हादरे जाणवले. नॅशनल सेंटर फॉर सिस्मोलॉजीच्या (NCS) माहितीनुसार, या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.५ इतकी नोंदवण्यात आली असून भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर खोलीवर होता.

### स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते



हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.०५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे आयोजित करण्यात आला आहे.

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभागाच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. स्वातंत्र्यदिनाच्या या मुख्य शासकीय सोहळ्यास जिल्ह्यातील नागरिक, अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले आहे. समारंभासाठी उपस्थित राहणाऱ्या नागरिकांनी व निमंत्रितांनी कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी किमान २० मिनिटे अगोदर उपस्थित राहावे, असेही प्रशासनाने कळविले आहे.

# अजिंठा लेणी की मृत्यूचा सापळा माणसाच्या मांसाची चटक लागलेली श्वापदे थेट पर्यटकांच्या दारात काल अंगावर धावून आले अस्वल आज साक्षात महाकाय अजगर

हिंदू प्रकाशवार्ता : शेख हक्कानी

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर वन विभागाची 'कुंभकर्णी झोप' आणि पर्यटकांचा जीव रामभरोसे जंगलात माणसाची घुसखोरी आता वन्यजीव घेणार भयानक सूड

फर्दापूर श्वास रोखून धरा आणि काळजावर दगड ठेवा कारण जगाच्या नकाशावर अभिमानाने मिरवणारी आपली अजिंठा लेणी आता पर्यटनासाठी नाही तर चक्क मानवी शिकारीचे नंदनवन बनत चालली आहे होय काल रात्री पर्यटकांच्या आणि सुरक्षारक्षकांच्या अंगावर साक्षात मृत्यू बनून चालून आलेले हिंस्र अस्वल ताजे असतानाच आज थेट माणसाला जिवंत गिळंकृत करण्यासाठी टपून बसलेला एक महाकाय अजगर (Indian Rock Python) लेणीच्या 'व्हिजिटर सेंटर' परिसरात दबा धरून बसलेला आढळला या थराराने संपूर्ण परिसरात दहशतीचा असा काही भूकंप आलाय की लेणी परिसरात येणाऱ्या प्रत्येकाच्या तोंडचे पाणी पळाले आहे





५ फुटांचा अजगर की साक्षात यमराज

अजिंठा लेणीचे व्हिजिटर सेंटर म्हणजे देश विदेशातील पर्यटकांची कायम वर्दळ असलेले ठिकाण पण याच ठिकाणी सुरक्षारक्षकांना असा काही भयानक प्रसंग दिसला की त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली तब्बल पाच फूट लांबीचा एक महाकाय आणि भयंकर अजगर कुणाची तरी शिकार करण्यासाठी जबडा उघडून दबा धरून बसला होता तज्ज्ञांचे म्हणणे ऐकाल तर अंगावर काटा येईल हा अजगर जर भुकेला असता तर त्याने एखाद्या माणसाला डोळ्याची पापणी लवते न लवते तोच जिवंत गिळला असता सुदैवाने सुरक्षारक्षकांनी जिवाच्या आकांताने काठ्या आपटून गदारोळ केल्याने हा यमराज जंगलाच्या दिशेने सरपटत गेला पण तो पुन्हा परतणार नाही याची गॅरंटी कोण देणार

झाडावर टपून बसलेला काळ

अजगराचा थरार संपतो न संपतो तोच दुसरीकडे एका हिंस्र अस्वलाने अजिंठा टी पॉईंट परिसराला स्वत ची जहागिरी बनवली आहे दिवसा आणि रात्री हे अस्वल चक्क झाडावर बसून पर्यटकांच्या हालचालींवर बारीक नजर ठेवून आहे एखाद्या क्षणी जर या अस्वलाने पर्यटकांच्या गर्दीत उडी मारली तर रक्ताचा जो सडा पडेल त्याची कल्पनाही करवत नाही तरीही प्रशासन मात्र आंधळं मुकं आणि बहिरं बनून या भयानक तमाशाची मजा बघत आहे

माणसाच्या हवरटपणाचा वन्य शाप

जंगलात भरपूर पाणी आणि अन्न असतानाही ही हिंस्र श्वापदे मानवी वस्तीत का घुसतायत उत्तर सोपं आणि तितकंच भयंकर आहे माणसाचा हवरटपणा जंगलात गुराख्यांचा बेकायदा सुळसुळाट विकासाच्या नावाखाली निसर्गाचा सुरू असलेला विध्वंस आणि पर्यटकांचा नको तिथे असलेला हस्तक्षेप यामुळे वन्यजीवांचा हक्काचा अधिवास आपणच उद्ध्वस्त केलाय आता हेच बेघर झालेले वाघ बिबटे अस्वल आणि अजगर माणसाच्या वस्तीत घुसून त्यांचा हिशोब चुकता करत आहेत

प्रशासनाला एखाद्या निष्पापाचा बळी हवाय का

एकीकडे आंतरराष्ट्रीय पर्यटकांकडून कोट्यवधी रुपये छापायचे आणि दुसरीकडे सुरक्षेच्या नावावर त्यांच्या हातात मरणाचे तिकीट' द्यायचे हा वन विभाग MTDC आणि ASI चा निर्लज्ज खेळ सुरू आहे जर आताच्या आता या वन्यजीवांचा बंदोबस्त केला नाही आणि जंगलातील मानवी अतिक्रमण रोखले नाही तर अजिंठा लेणी लवकरच एका भयंकर 'रक्तपाताची' साक्षीदार बनेल. आता तरी या एसी केबिनमध्ये झोपलेल्या अधिकाऱ्यांना जाग येणार का की त्यांना खरोखरच एखाद्या निरपराध पर्यटकाच्या बळीचीच वाट पाहायची आहे हा संतप्त सवाल आता संपूर्ण पंचक्रोशीतून विचारला जात आहे

# महानगरपालिकेच्या आस्थापना कराराला व्यापारी, उद्योजकांचा तीव्र विरोध

### शिवसेना व्यापारी, उद्योजकांच्या पाठीशी; करार मागे न घेतल्यास आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिकेच्या आस्थापना कराराला व्यापारी व उद्योजक संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला असून, हा करार तातडीने मागे घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. महानगरपालिकेने करार मागे घेतला नाही, तर व्यापारी व उद्योजकांच्या प्रश्नासाठी शिवसेना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी दिला.



बालाजी मंदिर येथे व्यापारी व उद्योजक संघटनेच्या वतीने बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे होते. यावेळी खैरे यांनी १६ ऑगस्ट १९८९ रोजी महानगरपालिकेत झालेल्या ठरावाची आठवण करून दिली.

ते म्हणाले की, शिवसेना पक्षाने तसेच आपण स्वतःने व्यापाऱ्यांच्या हितासाठी नेहमीच महानगरपालिका स्तरापासून ते संसदपर्यंत सकारात्मक भूमिका घेतली आहे. व्यापारी व उद्योजकांच्या हिताला बाधा आणणाऱ्या या कराराला आमचा ठाम विरोध असून, या लढ्यात शिवसेना व्यापारी व उद्योजकांच्या पाठीशी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिकेने व्यापारी व उद्योजकांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून आस्थापना कराराचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. या प्रश्नावर संघटितपणे लढा देण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीस शिवसेना शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, व्यापारी संघाचे पदाधिकारी तथा माजी नगरसेवक प्रफुल्ल मालाणी, उद्योजक हरिष पवार, संजय कांकरीया, स्वामी, विजय जैस्वाल, नगरसेवक सचिन खैरे, विनोद भट्टड, जयेश साहुजी, एरंडे, संतोष गादिया, अजंय मंत्री, संतोष कावले, दिलीप चोटलानी, राकेश जैन यांच्यासह व्यापारी संघटनेचे विविध पदाधिकारी व व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एमजीएमचे प्रा. बैजू पाटील यांना आंतरराष्ट्रीय छायाचित्रण पुरस्कार

### ‘नेचर : वाइल्डलाइफ अँड ॲनिमल्स’ विभागात ‘ऑनरेबल मेन्शन’ने गौरव

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ फोटोग्राफीचे विभागप्रमुख प्रा. बैजू पाटील यांना अमेरिकेतील इंटरनॅशनल ॲन्युअल फोटोग्राफी अवॉर्ड्समध्ये ‘नेचर - वाइल्डलाइफ अँड ॲनिमल्स’ या विभागात ‘ऑनरेबल मेन्शन’ हा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.



प्रा. बैजू पाटील यांनी छायाचित्रण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या छायाचित्रणातील योगदानाचे कौतुक करून मान्यवरांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

आंतरराष्ट्रीय स्तरावर मिळालेला हा सन्मान आपल्यासाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण असल्याची भावना प्रा. पाटील यांनी व्यक्त केली. या पुरस्कारामुळे छायाचित्रण क्षेत्रातील आपला प्रवास अधिक जोमाने, समर्पणाने आणि नव्या कल्पनांसह सुरू ठेवण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. बैजू पाटील यांच्या या यशाबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्राध्यापकवर्ग तसेच विद्यापीठातील संबंधितांनी त्यांचे अभिनंदन केले.

# 'स्वदेशी हातमाग व हस्तकला एक्स्पो 2026' चा आज दिमाखात शुभारंभ

### केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते उद्घाटन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालयाच्यावतीने छत्रपती संभाजीनगरमधील सागर रिसॉर्ट, एमआयडीसी येथे आयोजित तीन दिवसीय ‘स्वदेशी हातमाग व हस्तकला एक्स्पो २०२६’ चे आज १४ ऑगस्ट सकाळी १०.०० वाजता केंद्रीय क्रीडा व युवा कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन होत आहे. देशभरातील पारंपरिक हस्तकला आणि महिला उद्योजकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारे हे राष्ट्रीय प्रदर्शन १४ ते १६ ऑगस्टदरम्यान नागरिकांसाठी खुले राहणार असून, या प्रदर्शनाचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना प्रवेश पूर्णपणे मोफत ठेवण्यात आला आहे.

या राष्ट्रीय पातळीवरील प्रदर्शनाला देशभरातून ७५ हून अधिक प्रदर्शकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला असून, यामध्ये सहभागी झालेल्या एकूण प्रदर्शकांपैकी ७५ टक्क्यांहून अधिक महिला उद्योजक आणि लघुउद्योजकांचा समावेश आहे. नॅशनल ज्युट बोर्ड आणि ट्रायफेड यांसारख्या नामांकित राष्ट्रीय संस्थांचे या एक्स्पोला विशेष सहकार्य लाभले आहे. या तीन दिवसीय प्रदर्शनात ओडिशाची प्रसिद्ध पट्टाचित्र, राजस्थानची पिचवाई, झारखंडची सोहराई, बिहारची मधुबनी, उत्तराखंडची ऐपण कला तसेच महाराष्ट्राची शान असलेली पैठणी यांसारख्या विविध राज्यांतील पारंपरिक कला व हस्तकला नागरिकांना एकाच छताखाली पाहण्याची आणि थेट खरेदी करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. याशिवाय, एक्स्पोदरम्यान नागरिकांचे मनोरंजन करण्यासाठी आकर्षक फॅशन शोसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करण्यात आले असून 'पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स'नेही या उपक्रमाला मोठा पाठिंबा दिला आहे.

# वृक्षरोपणाच्या नावाखाली रोपे बेवारस ! सिल्लोड पंचायत समितीत प्रशासनाच्या दुर्लक्षाचा कळस

**सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि १३ :** पंचायत समिती कार्यालय परिसरात वृक्षरोपणासाठी आणण्यात आलेली सुमारे नऊ रोपे सध्या बेवारस अवस्थेत पडून असल्याचे चित्र समोर आले आहे. सहाय्यक गट विकास अधिकारी व गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयाच्या भिंतीलगत प्लास्टिकच्या पन्नीत जांभूळ, जाम, सीताफळ आदी रोपे अक्षरशः दुर्लक्षित अवस्थेत पडली आहेत.



वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी शासनाकडून विविध उपक्रम राबविले जात असताना पंचायत समिती कार्यालयासारख्या वर्दळीच्या ठिकाणीच वृक्षरोपणासाठी आणलेल्या रोपांची ही दैनावस्था प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. रोपांना लागवडीसाठी जागा, वेळ अथवा नियोजन मिळाले नसल्याने ती कार्यालयाच्या परिसरात पडून राहिली आहेत.

विशेष म्हणजे, १५ ऑगस्टच्या पार्श्वभूमीवर कार्यालय परिसरात स्वच्छता, साफसफाई आणि टापटीप करण्याची लगबग सुरू असतानाही या रोपांकडे संबंधितांचे लक्ष गेले नसल्याचे दिसून येते. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या रोपांमुळेच आता पंचायत समितीच्या कारभारातील दुर्लक्षाचे दर्शन घडत आहे.

या रोपांबाबत माहिती विचारली असता, “ही रोपे कृषी विभागाची असून त्यांच्याकडेच विचारावे,” अशी प्रतिक्रिया देण्यात आली. मात्र रोपे कोणत्याही विभागाची असोत, त्यांची योग्य वेळी लागवड करून संगोपनाची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे.

रोपांचे तातडीने वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्यासाठी पंचायत समिती प्रशासन काय पावले उचलणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## "शाल जोडे"




# मराठवाड्यात महामार्गावरील अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणांवर कठोर कारवाईचे विभागीय आयुक्तांचा आदेश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी मराठवाड्यातील सर्व राष्ट्रीय महामार्गालगतची अनधिकृत पार्किंग आणि अतिक्रमणे तातडीने हटवून कठोर कारवाई करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत त्यांनी महामार्ग सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट आदेश संबंधित यंत्रणांना दिले असून, यात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला आहे.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे पार पडलेल्या या बैठकीस छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नगरपरिषद प्रशासन आणि परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत महामार्ग सुरक्षेबाबत अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, महामार्गाच्या ROW मधील अनधिकृत ढाबे, हॉटेल, दुकाने आणि इतर व्यावसायिक अतिक्रमणे तात्काळ कारवाई करून हटविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महामार्गाच्या मुख्य मार्गावर किंवा 'पेव्हड शोल्डर'वर अवजड व व्यावसायिक वाहनांचे अनधिकृत पार्किंग रोखण्यासाठी जीपीएस, प्रगत वाहतूक प्रणाली आणि ई-चलान प्रणालीचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षाखाली 'जिल्हा महामार्ग सुरक्षा टास्क फोर्स' स्थापन करून दर पंधरा दिवसांनी आढावा घेतली जाईल तसेच पोलीस आणि परिवहन विभागाचे स्वतंत्र पथक राष्ट्रीय महामार्गाच्या २४ तास गस्ती पथकाशी समन्वय साधेल. अपघाताच्या प्रसंगी तातडीने मदत उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक ७५ किलोमीटर अंतराच्या आत रुग्णवाहिका आणि रिकव्हरी क्रेन उपलब्ध ठेवावी, तसेच ट्रक व इतर वाहनांच्या विश्रांतीसाठी 'ट्रक ले-बाय' विकसित करून तिथे पार्किंग, विश्रांतीगृह, भोजन आणि प्राथमिक उपचारांची सोय करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अपघातप्रवण क्षेत्रांत हाय मास्ट दिवे, रोड मार्किंग, स्पीड कॅमेरे आणि डिजिटल बोर्ड बसवण्याचे आदेश देण्यात आले असून, महामार्ग सुरक्षा क्षेत्रात एनएचएआय किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतीही नवीन व्यावसायिक परवानगी दिली जाणार नाही.

महामार्ग सुरक्षेच्या या सर्व उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करून संबंधित सर्व विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा जिल्हानिहाय अनुपालन अहवाल दर पंधरा दिवसांनी विहित मुदतीत विभागीय आयुक्त कार्यालयास सादर करावा, असे सक्त निर्देश यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले आहेत. याद्वारे मराठवाड्यातील महामार्ग प्रवास अधिक सुरक्षित आणि अपघातमुक्त होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## हवाई सुरक्षा आणि वैमानिकांची बेफिकिरी

फुकेतहून दिल्लीकडे येणाऱ्या एअर इंडियाच्या विमानाला हवेत बसलेले धक्के आणि विमान अचानक ३०० फूट खाली जाण्याच्या थरारक घटनेने हवाई सुरक्षेचे धिंडवडे काढले आहेत. या गंभीर तांत्रिक बिघाडापेक्षाही धक्कादायक बाब म्हणजे, विमानाचा मुख्य वैमानिकच अमली पदार्थाच्या (गांजा) प्रभावाखाली असल्याचे 'डॉप टेस्ट'मधून उघड झाले आहे. शेकडो प्रवाशांचे प्राण धोक्यात घालून अशा प्रकारे नशेत विमान चालवणे ही केवळ निष्काळजीपणाची पराकाष्ठा नसून एक प्रकारे मानवी जिवांशी केलेला खेळ आहे. या प्रकरणाने नागरी उड्डाण क्षेत्रातील सुरक्षेच्या आणि तपासणीच्या दाव्यांचे धिंडवडे काढले आहेत. वैमानिक हा विमानातील सर्व प्रवाशांच्या सुरक्षेचा मुख्य रक्षक असतो. वैयक्तिक तणाव असो किंवा अन्य काही कारणे, उड्डाणापूर्वी वैमानिकांची शारीरिक व मानसिक स्थिती तपासणे हे विमान कंपनीचे आणि विमान वाहतूक नियमकांचे (DGCA) प्राथमिक कर्तव्य असते. नशेत असलेल्या वैमानिकाला विमानाच्या कॉकपिटपर्यंत पोहोचू देणे, ही यंत्रणेतील अत्यंत गंभीर आणि भयानक त्रुटी आहे. सुदैवाने या घटनेत मोठा अनर्थ टळला; अन्यथा किती भीषण आपत्ती ओढावली असती, याची कल्पनाही करवत नाही. एअर इंडियासारख्या प्रस्थापित विमान कंपनीत घडलेला हा प्रकार आणि आधीच्या अपघातांचे प्रलंबित अहवाल यामुळे भारतीय हवाई सेवेच्या जगभरातील प्रतिमेला मोठा तडा गेला आहे. 'एअरबस'चे विशेष पथक आणि फ्रान्सचे नियामक अधिकारी या तांत्रिक बिघाडाची चौकशी करत असले, तरी मानवी चुका आणि बेफिकिरी रोखण्यासाठी अंतर्गत यंत्रणा मजबूत करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने आणि नागरी उड्डाण महासंचालनालयाने 'डॉप टेस्ट'चे नियम अत्यंत कडक करण्याचे दिलेले निर्देश योग्यच आहेत. मात्र, केवळ नवे नियम करून भागणार नाही, तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाची वैद्यकीय व अमली पदार्थ चाचणी सक्तीची आणि पारदर्शक पद्धतीने झाली पाहिजे. प्रवाशांच्या जिवाशी खेळणाऱ्या अशा बेजबाबदार वैमानिकांवर दाखला ठरेल अशी कठोर कारवाई झालीच पाहिजे, तरच हवाई प्रवासावरील प्रवाशांचा विश्वास कायम राहील.

समावेशक नवकल्पनांतून विकसित भारताची उभारणी; वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ व राष्ट्रीय नवोपक्रम प्रतिष्ठानमध्ये सामंजस्य करार

# तंत्रज्ञानापेक्षा तंत्रज्ञानाचा लाभ महत्त्वाचा; संशोधनाचा केंद्रबिंदू शेतकरी असावा : कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि

हिंदू प्रकाश वार्ता : प्रतिनिधी




**परभणी** :विकसित भारत २०४७च्या संकल्पनेला गती देण्यासाठी ग्रामीण भागातील नवकल्पना, स्थानिक ज्ञान आणि शेतकरी-केंद्रित संशोधनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन–इंडिया (एनआयएफ - NIF), गांधीनगर यांच्यामध्ये परभणी येथे दिनांक १२ ऑगस्ट २०२६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला. हा करार विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि आणि एनआयएफचे संचालक माननीय डॉ. अरविंद रानडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

सामंजस्य कराराच्या निमित्ताने विद्यापीठात आयोजित 'विकसित भारत २०४७ साठी समावेशक नवकल्पना' (Inclusive Innovations for Viksit Bharat 2047) या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आला. करारानुसार दोन्ही संस्थांच्या सहकार्याने समावेशक नवोपक्रम परिसंस्था विकसित करणे, विद्यार्थी व शेतकऱ्यांच्या नवकल्पनांचा शोध घेणे, त्यांचे दस्तऐवजीकरण, पडताळणी व प्रमाणीकरण करणे, नवकल्पकांना मार्गदर्शन व प्रशिक्षण देणे तसेच सामाजिक गरजांवर आधारित संयुक्त संशोधन प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

या सामंजस्य करारामुळे विद्यापीठातील पदवी, पदव्युत्तर, आचार्य व पदव्युत्तर संशोधकांना एनआयएफच्या सहकार्याने ग्रामीण नवकल्पना, मूल्यवर्धन, तंत्रज्ञान विकास आणि समाजाच्या अपूर्ण गरजांवर संशोधन करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना व शिक्षकांना नवकल्पकांना मार्गदर्शन करून त्यांच्या कल्पनांचे बाजारपेठेसाठी उपयुक्त समाधानांमध्ये रूपांतर करण्यासाठी सहकार्य करता येणार आहे. नवोपक्रम, उद्योजकता विकास आणि बौद्धिक संपदा हक्क व्यवस्थापनाबाबत संयुक्त कार्यशाळाही आयोजित करता येणार आहेत.

यावेळी बोलताना माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशनच्या स्थापनेपासून संस्थेच्या कार्याशी जोडलेल्या सर्व व्यक्ती व संस्थांप्रती आदर व्यक्त केला. एनआयएफसोबत सुरुवातीपासून असलेला संबंध आणि या संस्थेचे सक्षम नेटवर्क विद्यापीठासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे त्यांनी नमूद केले. संशोधन प्रकल्प आणि संशोधकांच्या नवकल्पनांकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज असून, शेतकऱ्यांच्या शेतावरील जोखीम कमी करणारे संशोधन उभारले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. तंत्रज्ञान महत्त्वाचे असले तरी तंत्रज्ञानाचा लाभ अधिक महत्त्वाचा आहे, असे स्पष्ट करत त्यांनी संशोधनाचा केंद्रबिंदू शेतकरी आणि समाजाच्या गरजा असाव्यात, असे प्रतिपादन केले.

सहज व सरळ जीवनापेक्षा स्पर्धात्मक वातावरणातून सक्षमता निर्माण होते, असे सांगून माननीय कुलगुरूंनी "प्रश्नांना प्रश्न म्हणून संबोधले, तर त्यांची उत्तरे शोधणे अधिक सोपे जाते," या कार्यपद्धतीचा विद्यापीठात अवलंब केला जात असल्याचे नमूद केले. विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, नवकल्पना-आधारित संशोधन, शेतकरी-केंद्रित विस्तार कार्य आणि कर्मचारी-केंद्रित प्रशासन या चारही बाबींवर भर दिल्यामुळे विद्यापीठाने राष्ट्रीय पातळीवर अनेक उल्लेखनीय यश संपादन केले असल्याचे त्यांनी सांगितले. नजीकच्या काळात विद्यापीठातील नोकरभरतीची प्रक्रिया देखील राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच प्रत्येकाने आपल्या कार्यासाठी सक्षम उत्तराधिकारी तयार करावा, जेणेकरून संस्थेचे कार्य सातत्याने पुढे चालू राहील, असे आवाहन त्यांनी केले.

एनआयएफचे संचालक डॉ. अरविंद रानडे यांनी 'Inclusive Innovation for Viksit Bharat' या विषयावर मार्गदर्शन करताना नवकल्पक संशोधक हे भारतीय अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचे सांगितले. भारताकडे मोठ्या प्रमाणावर तरुण मनुष्यबळाची जमेची बाजू असून, या लोकसंख्यात्मक लाभाचा प्रभावी उपयोग करण्याची गरज आहे. भारतीय समाजरचनेत ग्रामीण लोकसंख्येचा मोठा वाटा असून, मोठ्या प्रमाणावर अल्पभूधारक शेतकरी आहेत. त्यामुळे विकसित भारत २०४७चे स्वप्न साकारण्यासाठी उत्पादकता, भारतीय ओळख व गौरवशाली परंपरा, क्षमता आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता (resilience) यावर भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन संशोधन उपक्रम हे शेतकऱ्यांच्या मागण्या आणि त्यांच्या प्रत्यक्ष समस्यांवर आधारित असावेत, असे डॉ. रानडे यांनी स्पष्ट केले. कृषी, जल व स्वच्छता, आरोग्य व पोषण, ऊर्जा व पर्यावरण तसेच जीवनमान उंचावणे या क्षेत्रांमध्ये संशोधनाला चालना देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. भारताच्या Indigenous Knowledge आणि स्थानिक तंत्रज्ञानामध्ये अनेक समस्यांची व्यावहारिक उत्तरे दडलेली आहेत. देशातील शेतकरी, कारागीर आणि ग्रामीण नवकल्पकांकडे असलेल्या या ज्ञानाला मागील २५ वर्षांत एनआयएफने पुढे आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी एनआयएफच्या कार्यपद्धतीचे सविस्तर विश्लेषण केले.

व्हीएआरडी विभाग प्रमुख डॉ. राकेश माहेश्वरी यांनी नवकल्पक संशोधक नाविन्यपूर्ण कल्पना व संशोधन घेऊन येत असल्याचे सांगितले. या नवकल्पनांना शास्त्रज्ञांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून अधिक उपयुक्त, सुलभ आणि व्यवहार्य बनविण्याची आवश्यकता आहे. नवकल्पकांच्या संशोधनाला बौद्धिक संपदा हक्कांतर्गत संरक्षण देणे, योग्य नोंदणीसाठी मदत करणे आणि त्यांच्या तंत्रज्ञानाला व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक असून, एनआयएफ या दिशेने महत्त्वपूर्ण कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार यांनी केले. त्यांनी संशोधनातील नवकल्पनांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमास विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य, डॉ. राजेश क्षीरसागर, डॉ. राहुल रामटेके, डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. नीता गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्री. मोहन मुक्ताजी लांब, चिंचपूर (ता. धारूर, जि. बीड) आणि श्री. संभाजी शिराळे, पेठ शिवणी (ता. पालम, जि. परभणी) या नवकल्पक शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संशोधन उपसंचालक डॉ. रणजीत चव्हाण यांनी केले, तर आभार संशोधन उपसंचालक डॉ. सुनीता पवार यांनी मानले तर संशोधन उपसंचालक डॉ. प्रभाकर पडघन आणि संशोधन संचालनालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या विशेष व्याख्यानाचा लाभ विद्यापीठातील विभागप्रमुख, शास्त्रज्ञ, आचार्य व पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी घेतला.

# राज्यस्तरीय पथकाकडून खुलताबाद तालुक्यात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाचा आढावा

## वेरूळ, कसाबखेडा आरोग्य संस्थांनाही पथकाची भेट; निर्देशांकांचे नियमित गुणांकन व पर्यवेक्षणाच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, खुलताबाद तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र वेरूळ आणि उपकेंद्र कसाबखेडा येथे राज्यस्तरीय पथकाने भेट देऊन अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर आणि नोडल अधिकारी तथा जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे यांच्या नियोजनानुसार ही भेट आयोजित करण्यात आली. राज्यस्तरीय समन्वय अधिकारी रवींद्र देशमुख यांनी १ एप्रिल २०२६ पासून सुरू असलेल्या अभियानाच्या अंमलबजावणीचा आढावा घेत आवश्यक मार्गदर्शक सूचना दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामपंचायत स्तरावर बेसलाईन असेसमेंट करून उपकेंद्र व संबंधित आरोग्य संस्थांच्या स्तरावरही बेसलाईन निश्चित करावी. निर्धारित निर्देशांकांनुसार कामकाजाचे नियमित गुणांकन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तक यांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे देशमुख यांनी नमूद केले. खुलताबाद तालुक्यातील गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना अभियानाबाबत अद्ययावत माहिती व निर्देशांकांची चांगली जाण असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

जनजागृतीसाठी ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या दर्शनी भागात होर्डिंग, बॅनर आणि माहितीफलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच अभियानातील सर्व निर्देशांकांची दर आठवड्याला पर्यवेक्षणातून तपासणी करून प्रगतीचा आढावा घ्यावा आणि आवश्यक सुधारणा तातडीने कराव्यात, असे निर्देश देण्यात आले.

# शाळेला रोटरी इलाईट क्लबकडून 35 बेंच व दोन संगणक प्रदान

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर** : रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर इलाईटच्या वतीने ग्रामीण भागातील शाळांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमांतर्गत गंगापूर तालुक्यातील शिंगी येथील संत तुकाराम विद्यालयास ३५ बेंच आणि दोन संगणक प्रदान करण्यात आले.

रोटरी इलाईट क्लब शैक्षणिक क्षेत्रातील उपक्रमांसाठी नेहमीच अग्रेसर राहिला असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिलर हेल्थकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून (सीएसआर) या उपक्रमासाठी सहकार्य मिळाले. प्रकल्पप्रमुख डॉ. प्रदीप जबदे यांनी यासाठी समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

यावेळी रोटरी क्लबच्या अध्यक्षा डॉ. माधुरी जोशी, सतीश जोशी, माधुरी सांगवीकर, चंद्रकांत बहिवाल आणि अशोक चीनागी यांची उपस्थिती होती.

शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद सोनवणे तसेच शिक्षक विठ्ठल धोंगडे, संदीप सावंत, गजानन हरकळ आणि मंगल जाधव यांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले. शाळेला मिळालेल्या बेंच आणि संगणकामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांमध्ये भर पडणार असून, अध्यापन आणि डिजिटल शिक्षणाला यामुळे अधिक चालना मिळणार आहे.

# 'जिल्हास्तरीय पंच संमेलन' संपन्न; गावचा शाश्वत विकास साधण्याचे लोकप्रतिनिधींना आवाहन



हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर:** 'विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण)' राबवितांना गावाची गरज, स्थानिक भौगोलिक परिस्थिती, शेती आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा विचार करून कामांचे नियोजन करावे आणि याद्वारे ग्रामीण भागाचा शाश्वत विकास साधावा, असे महत्त्वपूर्ण आवाहन राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी आज येथे केले. छत्रपती संभाजीनगरमधील एमआयटी येथील मंथन हॉलमध्ये त्रि-स्तरीय पंचायत राज संस्थांमधील लोकप्रतिनिधी व पदाधिकाऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोजित जिल्हास्तरीय 'पंच संमेलन' पार पडले, ज्यामध्ये राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी देखील गावाच्या विकासाचा योग्य प्राधान्यक्रम ठरविण्याचे आवाहन केले.

एमआयटी, बीड बायपास येथील मंथन हॉलमध्ये 'विकसित भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) कायदा, २०२५' (VB-G RAM G Act, 2025) बाबत आयोजित या संमेलनाला राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील, आमदार संजना जाधव, आमदार विलास भुमरे, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी. एम. यांच्यासह पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावरील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि संबंधित विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या संमेलनात मार्गदर्शन करताना रोहयो मंत्री भरत गोगावले म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांना केवळ रोजगार उपलब्ध करून देणे हाच उद्देश नसून गावांच्या विकासासाठी कायमस्वरूपी आणि उपयुक्त मालमत्ता निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रि-स्तरीय संस्थांनी स्थानिक गरजांनुसार कामांचे नियोजन करावे. केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातून ग्रामीण रोजगार आणि उपजीविकेला बळ देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, क्षेत्रीय स्तरावर येणाऱ्या अडचणी लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून शासनापर्यंत पोहोचवून त्यावर सकारात्मक मार्ग काढण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, बदलत्या काळानुसार ग्रामपंचायतींची भूमिका आणि अधिकार अत्यंत व्यापक झाले आहेत. गावातील नागरिकांच्या गरजा, स्थानिक प्रश्न आणि आवश्यक विकासकामांची सर्वाधिक माहिती स्थानिक सरपंचांना व सदस्यांना असते, त्यामुळे उपलब्ध अधिकार, निधी आणि योजनांचा योग्य वापर करून गावाच्या विकासाचा प्राधान्यक्रम निश्चित करावा.

# झाशीची राणी लक्ष्मीबाई राष्ट्रीय तेजस्वितेचा सर्वकालीन आदर्श

## ह.भ.प. सौ. स्वाती खडके यांचे प्रतिपादन




**हिंदू प्रकाशवार्ता** : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : झाशीची राणी लक्ष्मीबाई या राष्ट्रीय तेजस्वितेचा सर्वकालीन आदर्श आहेत. त्यांनी इंग्रजांविरुद्ध पुकारलेले युद्ध पुढील काळातही अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देत राहील, असे प्रतिपादन ह.भ.प. सौ. स्वाती खडके यांनी केले.

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (१३ ऑगस्ट) हर्सूल येथील मनपा शाळेत राष्ट्रीय कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी रुजविण्याच्या उद्देशाने 'देव, देश, धर्म – समाज प्रबोधन ग्रुप'च्या वतीने कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. कीर्तनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्ती, संतपरंपरा, भारतीय संस्कृती तसेच सामाजिक जाणीव यांचा संदेश देण्यात आला.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या प्रेरणेने आणि शिक्षण विभागप्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षणाधिकारी भरत तीनगोटे, प्रशासन अधिकारी संजीव सोनार, विस्तार अधिकारी रईसा बेगम, विजय कोल्हे, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे तसेच सर्व केंद्रीय मुख्याध्यापकांच्या पुढाकाराने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रीय मुख्याध्यापक जगन्नाथ सपकाळ यांनी केले. सूत्रसंचालन सविता बांबर्डे यांनी केले, तर आभारप्रदर्शन श्रीमती कुऱ्हाडे यांनी केले. मृदंगावर संचालक दिनेश डोळे यांनी साथ दिली, तर तबल्यावर श्रीनिवास कुलकर्णी यांनी साथसंगत केली.

यावेळी सदस्या मीना तांबोळी, सुलभा केतकर, नंदिनी पोळ, वर्षा ब्रह्मपुरकर, तेजस्विनी कुलकर्णी यांच्यासह सर्व सदस्या, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिशन लक्षवेध अंतर्गत जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत 'मिशन लक्षवेध' योजना कार्यान्वित करण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून ऑलिम्पिक स्तरावर खेळल्या जाणाऱ्या १२ क्रीडा प्रकारांवर लक्ष केंद्रित करून राज्यातील खेळाडू, क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा वैद्यकशास्त्र, खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, करिअर मार्गदर्शन तसेच खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी-विदेशी संस्थांचा सहयोग आदी घटक विकसित करण्यात येणार आहेत.

'मिशन लक्षवेध' ही त्रिस्तरीय योजना असून राज्यस्तरावर हाय परफॉर्मन्स सेंटर, विभागीय स्तरावर स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर आणि जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत परभणी जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्राच्या माध्यमातून ॲथलेटिक्स व कुस्ती या क्रीडा प्रकारांमधून प्रत्येकी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावर ॲथलेटिक्स व कुस्ती या क्रीडा प्रकारांसाठी पात्र व गुणवत्ताधारक खेळाडूंच्या निवड चाचणीचे आयोजन करण्यात येणार आहे. संबंधित क्रीडा प्रकारात खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही केंद्रे कार्यान्वित करण्यात येत आहेत.

पात्रता व आवश्यक कागदपत्रे खेळाडूंचे वय त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी २१ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. अर्जासोबत जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, शासनमान्य डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधारकार्ड, मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे तीन छायाचित्रे, शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकांचे संमतीपत्र आदी कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

खेळाडू महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. क्रीडा स्पर्धेतील किमान कामगिरी म्हणून राज्यस्तरीय सहभाग किंवा पदक प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे. यामध्ये शालेय किंवा अधिकृत क्रीडा संघटनेच्या स्पर्धांचा समावेश राहील. मागील दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीचे मूल्यांकन करण्यात येईल. तसेच क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक राहील.

उपरोक्त निकष पूर्ण करणाऱ्या खेळाडूंची निवड तज्ज्ञ समितीमार्फत करण्यात येणार असून ही प्रक्रिया निवासी स्वरूपाची राहील. निवड झालेल्या खेळाडूंचा पूरक आहार, गणवेश, क्रीडा साहित्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचा प्रवास खर्च, प्रशिक्षक व मार्गदर्शक, वैद्यकीय उपचार, विमा तसेच प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च योजनेंतर्गत करण्यात येणार आहे.

निवड चाचणी जिल्हास्तरीय खेळाडू निवड चाचणी दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, स्टेशन रोड, परभणी येथे आयोजित करण्यात येणार आहे. पात्र खेळाडूंनी निवड चाचणीच्या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

पात्र खेळाडूंनी आपले अर्ज संपूर्ण माहितीसह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, स्टेशन रोड, येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. जास्तीत जास्त पात्र खेळाडूंनी या निवड चाचणीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क तालुका क्रीडा अधिकारी कल्याण पोले, मो. ९६७३७३२०७३ यांच्याशी साधावा.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# रोजगार हमी योजनेतील मंजूर कामे रद्द करु नयेत; मुदतवाढ देण्याची मागणी



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड तालुक्यातील सन २०२३ व २०२४ मध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत मंजूर झालेली वैयक्तिक सिंचन विहीर, गाय गोठे, रस्ते आदी कामे रद्द होऊ नयेत, तसेच या कामांना मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी शिवना पंचायत समिती गणाचे सदस्य श्री. शेख सलीम शेख भिकन यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजयजी शिरसाट तसेच रोहयो मंत्री ना. भरत गोगावले यांना पत्र देऊन मागणी केली आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक लाभार्थ्यांची वैयक्तिक सिंचन विहीर, गाय गोठे, रस्ते आदी कामे मंजूर झाली आहेत. मात्र विविध कारणांमुळे काही कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे मंजूर कामे रद्द न करता संबंधित लाभार्थ्यांना कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच सिल्लोड तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीर, गाय गोठे, रस्ते आदी कामे पूर्ण होऊन वर्ष उलटले आहे. मात्र या लाभार्थ्यांना अद्याप कुशल व अकुशल कामाचा निधी मिळालेला नाही. त्यामुळे प्रलंबित देयके तातडीने अदा करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही शेख सलीम शेख भिकन यांनी केली आहे.

शेतकरी व लाभार्थ्यांच्या हिताचा विचार करून मंजूर कामांना मुदतवाढ देण्यासह प्रलंबित कुशल-अकुशल निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

### वनामकृविच्या कृषि महाविद्यालयातर्फे स्वच्छता पंधरवड्यानिमित्त वृक्षारोपण व परिसर स्वच्छता उपक्रम

# कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते वृक्षारोपण

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, परभणीच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे दिनांक १ ते १५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित स्वच्छता पंधरवडा उपक्रमांतर्गत दिनांक १२ ऑगस्ट रोजी कृषि महाविद्यालय परिसरात परिसर स्वच्छता व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

हरियाली अमावस्येनिमित्त दिनांक १२ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धन आणि हरित व शाश्वत भविष्यासाठी योगदान देण्याचे आवाहन केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण तथा ग्रामीण विकास मंत्री माननीय




नामदार श्री. शिवराज सिंह चौहान जी यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत कृषि महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला.

यावेळी माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या हस्ते तसेच संचालक शिक्षण डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या उपस्थितीत आणि कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान कृषि महाविद्यालय परिसरात १० वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, हरित परिसर निर्मिती तसेच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागरूकता आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी संचालक शिक्षण डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी 'एक झाड मा के नाम' हा पर्यावरणपूरक संदेश दिला. कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रविण वैद्य यांनी महाविद्यालय परिसरात १,००० वृक्ष लागवडीचा संकल्प केला असून, त्यापैकी आतापर्यंत ३५० वृक्षांची लागवड करण्यात आल्याची माहिती दिली. लागवड केलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमास विभागप्रमुख डॉ. राजेश कदम, डॉ. हिराकांत काळपांडे, डॉ. सचिन मोरे, डॉ. हरिहर कौसडीकर, पदवी शिक्षण प्रभारी डॉ. दिलीप झटे, डॉ. सुरेश वाईकर, श्री. विजय गारकर तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता व वृक्षारोपण उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवित 'वृक्ष लावा, वृक्ष जगवा' या संदेशातून पर्यावरण संवर्धनाची जनजागृती केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. धीरज पात्रीकर, डॉ. फरिया खान, डॉ. तुकाराम मुंडे, डॉ. संतोष ठोंबरे, श्री. श्रीनिवास भारती आणि डॉ. सुवर्णा चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सर्वकष प्राथमिक आरोग्य सेवा प्रशिक्षण (CPHC)संपन्न



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन मुंबई, मा. आयुक्त राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांच्या पत्रकानुसार, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतीशा माथूर, जि. प. परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ . संजयकुमार पांचाळ,जि. प. परभणी. यांच्या आदेशानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र कौसडी तालुका जिंतूर येथे आयोजित C.P.H.C. (सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा) दोन दिवसीय. प्रशिक्षण सत्र अंतर्गत सकाळी प्रशिक्षण सत्र संपन्न झाले.

मा. डॉ. प्रसाद केंन्द्रेकर वैद्यकीय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण संघ यांच्या मार्गदर्शनाखाली, मा. तालुका आरोग्य अधिकारी जिंतूर , जिल्हास्तरावरुन आलेले प्रशिक्षक स्त्रीरोग, प्रसूती तज्ज्ञ डॉ. जयश्री यादव मॅडम यांनी स्त्रियांचे आजार, ANC, PNC Care, संस्थांत्मक प्रसुती दरम्यान गुणात्मक आरोग्य सेवा याबाबत प्रशिक्षण दिले डॉ. किशोर सुरवसे सर (अति. जिल्हा आरोग्य अधिकारी) यांनी किशोरवयीन आरोग्य, मानसिक स्वास्थ, बालकांचे आजार व कुपोषण डॉ . संतोष सीरशीकर, डॉ.विद्यासागर पाटील, डॉ.गिनगिने कान नाक घसा या विषयावर यांनी प्रशिक्षण दिले. जिल्हा आरोग्य विभागाचे आरोग्य विस्तार अधिकारी श्री ठाकूर परभणी,श्री माने व सतीश कांदे आरोग्य सहायक जिल्हा प्रशिक्षण केंद्र परभणी यांनी जिल्हास्तरावरुन प्रशिक्षणाचे नियोजन केले,

पाणी शुद्धीकरण, संसर्गजन्य अजार, मौखिक आरोग्य, सामान्य आजार, योग व त्यावरील उपचार आणि कौशल्यकृती द्वारे प्रत्याक्षिक दाखुन मार्गदर्शन केले जलशुद्धीकरणा विषयी संपूर्ण प्रशिक्षण दिले प्रसंगी डॉ अमोल आवचार वैद्यकीय अधिकारी, श्री दिलिप राठोड HA THO श्रीमती शिवलिला लाड, LHV श्रीमती अंजना गायकवाड ANM, श्री गिराम HA, श्रीमती लांभाडे आरोग्य सहायिका व सर्व समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेवक आरोग्य सेविका आशा स्वंयसेविका उपस्थित होते. सदरिल प्रशिक्षणास एकून ४१ प्रशिक्षाणार्थी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. प्रा. आ. केंद्र कौसडी येथील सर्व कर्मचाऱ्यांनी सदर प्रशिक्षण सत्रास उत्तम सहाकार्य केले.

# निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे यांचा राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते गुरूवारी सेवागौरव

### ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते डॉ. शेखर मगर संपादीत 'वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथाचेही होणार प्रकाशन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** ज्ञानसंदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रा. प्रकाश सोनवणे यांचा गुरूवारी (२० ऑगस्ट) सकाळी ११ वाजता राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते 'सेवागौरव' करण्यात येणार आहे. शासकीय दूध डेअरी जवळील महसूल प्रबोधिनीच्या सभागृहात आयोजित सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट असतील. यावेळी ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते 'प्रकाश सोनवणे; वंचितांचा ज्ञानदीप' या गौरव ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात येईल. ज्येष्ठ पत्रकार डॉ. शेखर मगर यांनी संपादीत केलेल्या या गौरव ग्रंथात ६८ जणांनी लेख लिहिले आहेत. या ग्रंथाला ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक तथा आंबेडकरी चळवळीचे विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे यांची प्रस्तावना आहे. तर भारतीय दलित पँथरचे संस्थापक, मुंबई येथील साहित्यिक ज. वि. पवार यांनी संक्षिप्त टीपण लिहिलेले आहे. प्रा. सोनवणे यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितींत छत्रपती संभाजीनगर शहरात शिक्षण संस्था उभारली. त्यांनी आंबेडकरनगर, मसनतपुरमध्ये शाळा उभारून वंचितांच्या मुलांसाठी ज्ञानदानाचे कार्य केले. जाधववाडी, नारेगाव, ब्रिजवाडी आदींसह विविध झोपडपट्यांमधील कामगार, श्रमिक, कष्टकऱ्यांच्या मुलांना मोफत शिक्षण दिले आहे.

सोनवणे यांच्या ३८ वर्षांच्या कार्याचा आढावा या गौरव ग्रंथात घेण्यात आला आहे. ३० जून रोजी नियत वयोमानानुसार ते मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या निवृत्तीनिमित्त आयोजित या सेवा गौरव सोहळ्यात सोनवणे यांचा मानचिन्ह, मानपत्र, शाल आदींनी बागडे यांच्या हस्ते सपत्निक सत्कार केला जाणार आहे. यावेळी जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे आणि मराठवाड्यातील शिक्षक आमदार विक्रम काळे आणि महापौर समीर राजूरकर यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थित असणार आहे. ज्येष्ठ साहित्यिक तथा विचारवंत डॉ. ऋषिकेश कांबळे गौरव ग्रंथावर भाष्य करतील. या सोहळ्याला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. शेखर मगर, अशोक कांबळे, माजी नगरसेवक गौतम लांडगे, एकनाथ पाखरे प्रा. विलास पांडे, वसंत राठोड, डॉ. राजेंद्र शेजुळ, बी. बी. शिंदे, संदीप सोनवणे, अभिजीत सोनवणे, किरणकुमार सोनवणे आदींनी केले आहे.

# कार्तिकी मनोज महाजन चे सीएच्या अंतिम परीक्षेत यश; सावजी परिवाराकडून सत्कार



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद येथील बाजार गल्ली येथे कार्तिकी महाजन मेहकर व तिचे आई-वडील यांचे सावजी परिवाराच्या वतीने सीएच्या परीक्षेत अंतिम परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल सत्कार चा कार्यक्रम करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सत्काराप्रसंगी कार्तिकीने सांगितले रोज पंधरा पंधरा तास अभ्यास केला या वेळेस आई-वडिलां ची खूप साथ लाभली भविष्यात आणखीन यश संपादन करायचे आहे प्रत्येकाने जिद्द व चिकाटीने अभ्यास केला तर यश नक्कीच मिळते. सत्कारा निमित्य सर्व समाज बांधवांचे तिने आभार मानले.

या प्रसंगी रवींद्र सावजी अनिल चौधरी श्याम सावजी मनोज महाजन लक्ष्मीकांत महाजन सुरेश शेटे राजेश सावजी महेंद्र सावजी सुधीर महाजन सागर सावजी दिनेश सावजी उमेश सावजी राकेश सावजी शकुंतला सावजी दिपाली सावजी विद्या चौधरी संध्या सावजी जय श्री महाजन मंगल सावजी शोभना महाजन नयना सावजी माधुरी सावजी आदींची उपस्थिती होती

# मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली परभणीत जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** परभणी जिल्ह्यात उद्योग, व्यवसाय आणि गुंतवणुकीला चालना देण्याच्या उद्देशाने 'इन्व्हेस्ट इन परभणी' या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा उद्योग केंद्र, परभणीच्या वतीने आयोजित ही परिषद रविवार, 16 ऑगस्ट 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 4 या वेळेत परभणी येथील अक्षदा मंगल कार्यालय येथे होणार आहे.

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली ही गुंतवणूक परिषद होणार असून उद्योग व सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्षाचे (MAITRI) चे विशेष आयुक्त वैभव वाघमारे तसेच परभणीचे जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. 'इन्व्हेस्ट इन परभणी'च्या माध्यमातून परभणी जिल्ह्याची गुंतवणूक क्षमता राज्याच्या औद्योगिक नकाशावर अधिक ठळकपणे मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. उद्योजकांना नवीन व्यवसाय संधी, संभाव्य गुंतवणूकदारांना जिल्ह्याची क्षमता आणि उद्योग उभारणीसाठी उपलब्ध असलेल्या संधी याबाबत संवाद साधता येणार आहे.

परभणी जिल्ह्यात उद्योग व गुंतवणुकीचे नवे पर्व सुरू करण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असून, 'गुंतवणूक वाढवा, उद्योग उभारा आणि रोजगाराच्या संधी निर्माण करा' या दिशेने जिल्ह्याला पुढे नेण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरण्याची अपेक्षा आहे.

उद्योजक, व्यापारी, गुंतवणूकदार तसेच उद्योग क्षेत्राशी संबंधित सर्वांनी 'इन्व्हेस्ट इन परभणी' या महत्त्वपूर्ण गुंतवणूक परिषदेस आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग व सेवा विभागाचे सह आयुक्त स्वप्निल आर. राठोड व जिल्हा उद्योग केंद्र, परभणीचे सहायक आयुक्त अमोल एस. बाळे यांनी केले आहे.

# ज्ञानोपासक मध्ये भारत सरकार शिष्यवृत्ती कार्यशाळा संपन्न

**जिंतूर :** सामाजिक न्याय, विशेष सहाय्य विभाग आणि समान संधी केंद्र, परभणी व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष ज्ञानोपासक महाविद्यालय जिंतूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारत सरकार शिष्यवृत्ती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूरचे प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून समाज कल्याण विभाग, परभणी येथील सहाय्यक आयुक्त श्री. राजू एडके होते.

शासनाच्या विविध कल्याणकारी योजना आणि विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती विद्यार्थ्यापर्यंत पोहोचण्यामध्ये




समाज कल्याण विभाग अतिशय महत्त्वाची भूमिका पार पाडते. श्री राजू एडके साहेब यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात भारत सरकार शिष्यवृत्ती पात्रता, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ऑनलाइन अर्ज, नूतनीकरण प्रक्रिया, यामध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी आणि शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात ज्ञानोपासक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे यांनी विद्यार्थ्यांना समाज कल्याण विभागाकडून उपलब्ध असलेल्या विविध शासनाच्या योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला. या कार्यशाळेमध्ये ज्ञानोपासक महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्याम गोरे, अंतर्गत हमी कक्षाचे समन्वयक डॉ. संतोष जाधव, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रल्हाद पिसाळ व समाज कल्याण विभाग, परभणी येथील निरीक्षक श्री. दवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.


या कार्यशाळेसाठी वेगवेगळ्या कॉलेजचे प्राचार्य तथा संबंधित विभागात कार्य करणारे कर्मचारी उपस्थित होते. त्यांनीही आपल्या सर्व विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा उपलब्ध करून देता येईल यावर सांगोपांग चर्चा केली. कार्यशाळेचे सूत्रसंचालन शिष्यवृत्ती विभागाचे समन्वयक डॉ. पंडित चोपडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापिका सुवर्णा भगत यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.

# मार्केट कमिटी ड्रेनेज चेंबर मुळे परिसरात दुर्गंधी



पैठण :- पैठण कृषी उत्पन्न बाजार समिती बाजार यार्ड प्रवेश द्वारा समोरील ड्रेनेज चोकअप झाल्याने परिसरात दुर्गंधीयुक्त घाण पाणी रस्त्यावर वाहत असल्याने या भागात कमालीचे अस्वच्छता पसरली आहे. याबाबत पैठण नगर परिषदेला सूचना दिली असल्याची माहिती मार्केट कमिटीचे सचिव नितीन विखे यांनी दिली. पैठण कृषी उत्पन्न बाजार समिती प्रवेशद्वार लगतच समोरील बाजूस ड्रेनेज लाईन नादुरुस्त झाल्याने परिसरात अनेक दिवसांपासून अस्वच्छता पसरली आहे . या ठिकाणी,भल्या पहाटे भरणारे भाजी मार्केट, आडत धान्य बाजार मार्केट,जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा पैठण तसेच शॉपिंग सेंटर असल्याने परिसरात दररोज हजारोंच्या संख्येने शेतकरी येतात. रस्त्यावर वाहत असलेल्या नालीच्या उग्र वासाने नागरिक पुरते हैराण झाले आहेत.सदरील बाब लक्षात येताच याबाबत आपण नगर परिषद स्वच्छता विभाग यांना सूचना दिली असल्याची माहिती सचिव विखे यांनी दिली.

# छत्रपती संभाजीनगरच्या पंडित कृष्णाची देशातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांमध्ये निवड




छत्रपती संभाजीनगर : करिअरच्या माध्यमातून स्वावलंबन, जबाबदारी आणि कुटुंबाच्या जवळ राहून प्रगती साधण्याचे स्वप्न छत्रपती संभाजीनगरच्या पंडित कृष्णाने साकारले आहे. 'सॅमसंग दोस्त' या उपक्रमांतर्गत देशभरातील ९,४०० हून अधिक सेल्स प्रशिक्षणार्थींमधून सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या ३० प्रशिक्षणार्थींची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये पंडित कृष्णाचा समावेश झाला आहे. त्याचा नुकताच गुरुग्राम येथील सॅमसंग इंडियाच्या प्रादेशिक मुख्यालयात गौरव करण्यात आला.

# नॅशनल महाविद्यालयामध्ये अवयव दाना दिन निमित्त जनजागृती

सिल्लोड (प्रतिनिधी) दि.13, नॅशनल आयुर्वेदिक कॉलेज, सिल्लोड येथे जागतिक अवयवदान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अवयवदानाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविणे, त्याबाबत असलेले गैरसमज दूर करणे आणि अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानासाठी पुढे यावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक शेख सलीम शेख हुसेन होते. यावेळी उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, डॉ. गणेश सपकाळ, डॉ. सय्यद राशीद, डॉ. अहमद शरीफ देशमुख, डॉ. प्रदीप हटकर, डॉ. साहेबराव जरे, डॉ. करबला शेख आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच धन्वंतरी वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी नॅशनल आयुर्वेदिक कॉलेजच्या विद्यार्थिनी कुमारी शेख सारा, सचिन तुपकर, अंकित यादव व शर्वरी गांगुर्डे यांनी



अवयवदानाचे महत्त्व स्पष्ट केले. अवयवदानामुळे एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतरही त्याचे अवयव गरजू रुग्णांना नवजीवन देऊ शकतात. त्यामुळे अवयवदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवतेची आणि सामाजिक बांधिलकीची भावना असल्याचे विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

यावेळी डॉ. सय्यद राशीद, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ आणि डॉ. अहमद शरीफ देशमुख यांनी मार्गदर्शन करताना अवयवदानाबाबत समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगितले. अनेक नागरिकांमध्ये अवयवदानाबाबत गैरसमज, भीती किंवा अपुरी माहिती असते. हे गैरसमज दूर करून अवयवदानाची प्रक्रिया, त्याचे सामाजिक व वैद्यकीय महत्त्व याबाबत योग्य माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, अवयवदानाबाबत जनजागृती करण्यासाठी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनींनी महाविद्यालयाच्या परिसरासमोर आकर्षक रांगोळ्या साकारल्या. विविध संदेश व कलाकृतींच्या माध्यमातून अवयवदानाचे महत्त्व त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून विशद करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत अवयवदानाबाबत सकारात्मक जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कु.गायत्री जाधव यांनी केले. प्रास्ताविक डॉ. अहमद शरीफ देशमुख यांनी केले, तर प्राध्यापक अर्चना खरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसीम शेख, गणेश सुरडकर, इमरान शहा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

समाजापर्यंत पोहोचविणे, त्याबाबत असलेले गैरसमज दूर करणे आणि अधिकाधिक नागरिकांनी अवयवदानासाठी पुढे यावे, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक शेख सलीम शेख हुसेन होते. यावेळी उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, डॉ. गणेश सपकाळ, डॉ. सय्यद राशीद, डॉ. अहमद शरीफ देशमुख, डॉ. प्रदीप हटकर, डॉ. साहेबराव जरे, डॉ. करबला शेख आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच धन्वंतरी वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रारंभी नॅशनल आयुर्वेदिक कॉलेजच्या विद्यार्थिनी कुमारी शेख सारा, सचिन तुपकर, अंकित यादव व शर्वरी गांगुर्डे यांनी अवयवदानाचे महत्त्व स्पष्ट केले. अवयवदानामुळे एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतरही त्याचे अवयव गरजू रुग्णांना नवजीवन देऊ शकतात. त्यामुळे अवयवदान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून मानवतेची आणि सामाजिक बांधिलकीची भावना असल्याचे विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले.

यावेळी डॉ. सय्यद राशीद, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ आणि डॉ. अहमद शरीफ देशमुख यांनी मार्गदर्शन करताना अवयवदानाबाबत समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगितले. अनेक नागरिकांमध्ये अवयवदानाबाबत गैरसमज, भीती किंवा अपुरी माहिती असते. हे गैरसमज दूर करून अवयवदानाची प्रक्रिया, त्याचे सामाजिक व वैद्यकीय महत्त्व याबाबत योग्य माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, अवयवदानाबाबत जनजागृती करण्यासाठी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनींनी महाविद्यालयाच्या परिसरासमोर आकर्षक रांगोळ्या साकारल्या. विविध संदेश व कलाकृतींच्या माध्यमातून अवयवदानाचे महत्त्व त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून विशद करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत अवयवदानाबाबत सकारात्मक जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कु.गायत्री जाधव यांनी केले. प्रास्ताविक डॉ. अहमद शरीफ देशमुख यांनी केले, तर प्राध्यापक अर्चना खरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसीम शेख, गणेश सुरडकर, इमरान शहा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पशुधन व्यवसायातून शेतकऱ्यांनी उद्योजक बनावे : पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर वालूर

## येथे मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न, पालकमंत्र्यांच्या हस्ते कन्या प्रशालेच्या तिरंगा रॅलीस हिरवी झेंडी दाखवत प्रारंभ

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी, दि. 13 (जिमाका) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेऊन शेतीला पूरक पशुपालन व्यवसायातून उत्पन्नवाढ साधावी, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री तथा पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आज येथे केले.

वालूर येथे मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, गटविकास अधिकारी उदय जाधव, तहसीलदार शविाजी मगर, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. मनोज घाटे, सहायक आयुक्त डॉ. दीपक धर्माधिकारी, जिल्हा परिषदेचे सदस्य श्रीमती साक्षी साडेगावकर, डॉ. आशिष डख, पंचायत समिती सभापती गजानन डोंबे, सदस्य गणेश मुंढे, शिवराम कदम, दीना मगर, वालूरचे सरपंच संजय साडेगावकर, पशुधन अधिकारी (विस्तार) डॉ. प्रकाश सावने, सुनील हट्टेकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, कृषिप्रधान देशात बहुतांश कुटुंबे शेतीवर अवलंबून आहेत. शेतीसोबत पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि शेळीपालन यांसारखे पूरक व्यवसाय केल्यास शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. शेळीच्या दुधापासून विविध दुग्धजन्य पदार्थ, चीज, तूप आदी मूल्यवर्धित उत्पादने तयार करून अतिरिक्त उत्पन्न मिळवावे. यासाठी पशुपालक उद्योजकांनी योग्य प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकरी पशुधन व्यवसायातून आर्थिक सक्षमतेकडे वाटचाल करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र कार्यशाळा घेण्याच्या सूचनाही यावेळी त्यांनी आयोजकांना दिल्या. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील 950 शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. या योजनेसाठी 15 ऑगस्टपासून ऑनलाइन अर्जप्रक्रिया सुरू होणार असून, शेतकऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करावेत, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देताना पालकमंत्र्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत परभणी जिल्ह्यात पहिल्या यादीत एक लाख 72 हजार शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर झाली असून शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत असल्याचे सांगितले. लवकरच



तालुक्यात ड्रोन उपलब्ध करून देण्यात येणार असून जिल्ह्यात 'ड्रोन दीदी' तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहिलेले शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यात शेतकऱ्यांचे 43 कोटी रुपयांचे वीजबिल माफ करण्यात आले असून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांसाठी पाणंद रस्त्यांची कामेही करण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. जिल्ह्यात 'सिल्क आणि मिल्क' योजना राबविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. तसेच आगामी काळात सुमारे बाराशे कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात येणार असून, त्यातून जिल्ह्यात उद्योगांना चालना मिळेल. तसेच जिल्ह्यात औद्योगिक वसाहतींच्या विकासासाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

**शेतीसोबत पशुपालनाचा व्यवसाय वाढवावा – जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पशुपालनातून नियमित उत्पन्न मिळविण्याची मोठी संधी आहे. अल्पभूधारक, मध्यम भूधारक तसेच अधिक शेती असलेल्या शेतकऱ्यांनी शेळीपालन, गोपालन आणि डेअरी व्यवसायाकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी कार्यशाळेला उपस्थित शेतकऱ्यांना केले.

चारा, पशुखाद्य, दूध उत्पादन, दुग्धजन्य पदार्थ, मांस उत्पादन आणि बाजारपेठ यांचा योग्य समन्वय साधल्यास पशुधन व्यवसाय अधिक फायदेशीर करता येतो. शेतीपासून पशुधनासाठी चारा आणि पशुधनापासून शेतीसाठी खत उपलब्ध होते. त्यामुळे एकात्मिक शेतीचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. सोयाबीन, तूर आदी पिकांपासून चारा तसेच तुतीच्या पाल्यापासून प्रथिने मिळविता येतात. पशुखाद्य, स्वच्छ पाणी, पोषण आणि जनावरांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतल्यास उत्पादन व नफा वाढू शकतो, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तरुणांनी आणि महिलांनी उच्चशिक्षण घेऊन केवळ नोकरीसाठी शहराकडे स्थलांतर करण्याऐवजी गावातच पशुसंवर्धनावर आधारित व्यवसाय उभारावेत. नोकरी मागणारे होण्याऐवजी नोकरी देणारे उद्योजक व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी केले. शेतीला पूरक व्यवसाय वाढविण्यासाठी प्रयत्न केल्यास निश्चितच मोठे उद्योजक होता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यशाळेचे प्रास्ताविक पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. दीपक धर्माधिकारी यांनी केले. यावेळी डॉ. श्रीनिवास कारले यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेसह राज्यातील पशुउद्योजकांसाठी उपलब्ध विविध योजनांची माहिती दिली. ऑनलाइन अर्जप्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, अनुदान, अनुदान वितरण तसेच लाभार्थी हिस्सा याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

उद्योग उभारणीसाठी बँकेतील वित्तपुरवठ्याबाबत आरसेटीचे वित्तीय सल्लागार सुनील हट्टेकर यांनी पशुपालन योजनांसाठी बँकेमार्फत निधीपुरवठा केला जात असून, शेतकरी उद्योजकांनी त्यांचा सिबील स्कोअर चांगला ठेवावा, असे सांगितले.

कार्यशाळेदरम्यान काही शेतकरी उद्योजकांना पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात प्रशिक्षण प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. लोकसहभागातून कार्यशाळा यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल पालकमंत्र्यांनी आयोजक व सहभागींचे आभार मानले.

तत्पूर्वी पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर यांनी वालूर येथील कन्या प्रशालेतील विद्यार्थिनींच्या तिरंगा रॅलीला हिरवी झेंडी दाखवली.

# अजिंठा लेणीत चोरांचा सुळसुळाट प्रशासनाचे तिसरे डोळे फुटले भरदिवसा शॉपिंग प्लाझामधून दुचाकी पळवली MTDC आणि पोलिसांचे कॅमेरे केवळ 'शोभेच्या वस्तू

## देशी विदेशी पर्यटकांच्या सुरक्षेला रामराम भरदिवसा घडलेल्या चोरीचा तपास लावणार कसा असा संतप्त सवाल

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर जगप्रसिद्ध अजिंठा लेणीत येणाऱ्या देशी विदेशी पर्यटकांच्या सुरक्षेच्या फक्त वल्गना केल्या जातात हे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहे शनिवारी भरदिवसा अजिंठा लेणीच्या शॉपिंग प्लाझामधून MTDC पार्किंग एका दुकानदाराची मोटरसायकल चोरीला गेल्याची खळबळजनक घटना घडली आहे सर्वात संतापजनक बाब म्हणजे लाखो रुपये खर्चून बसवलेले MTDC चे आणि पोलिसांचे सीसीटीव्ही कॅमेरे चक्क बंद अवस्थेत असल्याने हे कॅमेरे नक्की सुरक्षेसाठी आहेत की फक्त शोभेच्या वस्तू असा संतप्त सवाल नागरिक आणि पर्यटक विचारत आहेत

**नेमकी घटना काय**

मिळालेल्या माहितीनुसार फर्दापूर येथील रहिवासी मुस्ताक शेख इसाक वय ३० यांचे शॉपिंग प्लाझामध्ये दुकान आहे शनिवारी सकाळी ते नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी आले होते दिवसभर दुकानात व्यवसाय केल्यानंतर संध्याकाळी साडेपाच वाजता दुकान बंद करून ते घरी जाण्यासाठी MTDC च्या पार्किंगमध्ये आले मात्र तिथे त्यांची MH 20 EV 2050 या क्रमांकाची दुचाकी गायब होती! आजूबाजूला शोधाशोध करूनही गाडी न सापडल्याने अखेर मुस्ताक शेख यांनी शनिवारीच फर्दापूर पोलीस स्टेशनमध्ये गाडी चोरीला गेल्याची रीतसर तक्रार दाखल केली

**प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराचे वाभाडे**

चोरीच्या या घटनेपेक्षाही भयंकर बाब म्हणजे येथील कुचकामी सुरक्षा व्यवस्था MTDC चे कॅमेरे गाढ झोपेत ज्या शॉपिंग प्लाझामध्ये ही घटना घडली तिथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत पण हे सर्व कॅमेरे बंद पडलेले आहेत

पोलिसांचे कॅमेरेही आंधळे छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अजिंठा टी पॉईंटच्या वळणावर फर्दापूर पोलिसांच्या अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत दुर्दैवाने पोलिसांचे हे कॅमेरेही बंदच आहेत

**चोर सापडणार कसा**

आता सर्वात मोठा प्रश्न हा आहे की जेव्हा MTDC आणि पोलिसांचे सर्व कॅमेरेच बंद पडलेले आहेत तेव्हा गाडी चोरी करून पसार झालेल्या या चोराचा शोध पोलीस घेणार तरी कसा जर एका स्थानिक दुकानदाराची गाडी भरदिवसा सुरक्षित नाही तर इथे येणाऱ्या परदेशी आणि देशांतर्गत पर्यटकांच्या सामानाची आणि जिवाची काय शाश्वती

**प्रशासनाला इशारा**

केवळ नावापुरते सीसीटीव्ही कॅमेरे लावून पर्यटकांच्या डोळ्यात धूळफेक करणाऱ्या प्रशासनाने तात्काळ हे सर्व कॅमेरे दुरुस्त करून सुव्यवस्थित करावेत अन्यथा भविष्यात इथे एखादी मोठी दुर्घटना किंवा मोठा दरोडा पडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी MTDC आणि पोलीस प्रशासनाचीच राहील

# गुणवत्तेची भरारी! स्वराली कासारेची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**राजूर :** जिद्द, मेहनत आणि गुणवत्तेच्या जोरावर कु. स्वराली अरुण कासारे हिने इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. स्वरालीने भोकरदन तालुक्यात प्रथम, तर जालना जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावत आपल्या यशाची शानदार नोंद केली. तिने 89.33 टक्के गुण मिळविले.

जि. ई. एस. एज्युकेशनल ग्रुप, राजूर येथील विद्यार्थिनी असलेल्या स्वरालीने मिळविलेल्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. तिच्या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे प्रोत्साहन आणि स्वरालीची सातत्यपूर्ण मेहनत यांचा मोलाचा वाटा आहे. स्वरालीच्या या उज्ज्वल यशाबद्दल जी ई एस एज्युकेशनल ग्रुप राजूर चे सर्वेसर्वा ज्ञानेश्वर पाटील पुंगळे, शाळेच्या प्राचार्या आशाताई पुंगळे. मुख्याध्यापक शाळा व्यवस्थापन, शिक्षक, पालक आणि शिक्षणप्रेमींकडून तिचे अभिनंदन करण्यात आले.

# फर्दापूरमध्ये हर घर तिरंगा रॅलीचा अभूतपूर्व उत्साह पुरातत्व विभाग आणि पोलिसांचा उत्स्फूर्त सहभाग

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात 'हर घर तिरंगा' अभियानाचा मोठा उत्साह पाहायला मिळत आहे याच अनुषंगाने जगप्रसिद्ध अजिंठा लेणीच्या पायथ्याशी असलेल्या फर्दापूर येथे गुरुवारी सकाळी ७ वाजता एका भव्य आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीमध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग आणि फर्दापूर पोलिसांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हातात तिरंगा घेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला

**रॅलीमधील ठळक वैशिष्ट्ये**

देशभक्तीचा जागर ही रॅली पुरातत्व विभागाच्या कर्मचारी वसाहतीपासून स्टाफ क्वार्टर्स सुरू झाली आणि गावाच्या मुख्य दरवाजापर्यंत मार्गस्थ



झाली रॅलीच्या संपूर्ण मार्गावर हर घर तिरंगा आणि गगनभेदी घोषणा देण्यात आल्या ज्यामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीमय झाला होता

प्रमुख अधिकाऱ्यांचे नेतृत्व या अभिमानास्पद रॅलीमध्ये अजिंठा लेणी येथील पुरातत्व विभागाचे प्रमुख मनोज पवार आणि फर्दापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांनी स्वत सहभागी होऊन कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढवला

**उत्स्फूर्त सहभाग**

अधिकाऱ्यांसोबतच पुरातत्व विभागाचे सर्व सुरक्षा रक्षक कर्मचारी आणि फर्दापूर पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार या रॅलीत अत्यंत उत्साहाने आणि मोठ्या संख्येने सहभागी झाले होते

# 374 शासकीय, अशासकीय कार्यालयांची तपासणी अन् कोमल कोरे यांच्याकडून कारवाईचा इशारा

## महिला सुरक्षेसाठी प्रशासनाचा कडक पवित्रा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळास प्रतिबंध करणाऱ्या 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम, २०१३' (पोश ऍक्ट) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात व्यापक तपासणी मोहीम राबविण्यात आली आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोमल कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील १५४ शासकीय आणि २२० खासगी अशा एकूण ३७४ कार्यालयांची तपासणी करण्यात आली असून, नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आणि राज्य शासनाच्या आदेशानुसार जून २०२६ पासून राज्यातील शासकीय व खासगी कार्यालये, संस्था, कंपन्या तसेच त्यांच्या शाखांमध्ये पोश ऍक्ट-२०१३ मधील तरतुदींची पूर्तता तपासण्यासाठी ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत झालेल्या तपासणीमध्ये नियमांची पूर्तता न करणाऱ्या कार्यालयांना जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयामार्फत 'कारण दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे.

या कायद्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय व खासगी कार्यालयाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे, समिती सदस्यांना व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, वार्षिक अहवाल अद्ययावत करणे आणि सर्व माहिती केंद्र शासनाच्या 'SHe-Box' (Sexual Harassment Electronic Box) या ऑनलाइन पोर्टलवर नोंदविणे बंधनकारक आहे. तपासणीदरम्यान ज्या कार्यालयांनी आवश्यक पूर्तता केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, त्यांना विहित मुदत देण्यात आली आहे.

नोटीस बजावलेल्या कार्यालयांनी विहित मुदतीत आवश्यक कायदेशीर पूर्तता न केल्यास, संबंधित जिल्हाधिकारी व जिल्हा महिला व बाल विकास यंत्रणेमार्फत अधिनियमातील तरतुदीनुसार ५० हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित, भयमुक्त आणि सन्मानाचे वातावरण मिळवून देण्यासाठी प्रशासनाने ही मोहीम अधिक तीव्र केली असून, सर्व कार्यालयांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कोमल कोरे यांनी केले आहे.

# पालकमंत्री सौ. मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली जिंतूर शहरात भव्य तिरंगा रॅली उत्साहात

**जिंतूर तालुका प्रतिनिधी :** जिंतूर येथे स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री सौ. मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली जिंतूर शहरातून भव्यदिव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. देशभक्तीच्या उत्साहाने भारलेल्या वातावरणात पार पडलेल्या या रॅलीत विविध शाळांमधील विद्यार्थी, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

तिरंगा रॅलीची सुरुवात कृषी उत्पन्न बाजार समिती येथून झाली. त्यानंतर रॅली नृसिंह चौक, वरुड वेस, मेन चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे तहसील कार्यालय येथे पोहोचून रॅलीचा समारोप झाला. संपूर्ण मार्गावर तिरंगा ध्वज, देशभक्तीपर घोषणा आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे जिंतूर शहरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.



रॅलीमध्ये नगराध्यक्ष प्रताप देशमुख, गटनेते सचिन गोरे, आचार्य महेश चैतन्य महाराज, जिल्हा संघटक डॉ. पंडित दराडे, किशोर खिस्ते, तालुकाध्यक्ष गोविंद थिटे, शहराध्यक्ष विलास भंडारी, सुनील भोंबे, महिला मोर्चा अध्यक्ष संगीता जाधव, वैष्णवी कुलकर्णी, मनिषा केंद्रे, आशाताई खिल्लारे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या रॅलीमध्ये जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जिंतूर, अकॅडमी, सुभाषचंद्र राठी पालक मंदिर, श्रीमती शकुंतलाबाई बोर्डीकर कन्या शाळा व महाविद्यालय, एकलव्य शाळा, उर्दू माध्यमिक शाळा, कस्तुरबा गांधी विद्यालय आदी शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

हातात तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्', 'जय हिंद' अशा देशभक्तीपर घोषणांनी शहर दुमदुमून सोडले. रॅलीच्या मार्गावर नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभागींचे स्वागत केले.

तिरंग्याच्या रंगांनी सजलेले रस्ते, विद्यार्थ्यांचा उत्साह आणि देशभक्तीच्या घोषणांमुळे जिंतूर शहरात स्वातंत्र्यदिनाचा उत्साह द्विगुणित झाला. राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि स्वातंत्र्याच्या मूल्यांचा संदेश या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

पालकमंत्री सौ. मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेली ही भव्य तिरंगा रॅली जिंतूर शहरातील देशभक्तीचे दर्शन घडविणारी ठरली.

# उलवेच्या समिक्षा मढवीची चमकदार कामगिरी; रायगडमध्ये चौथा तर पनवेल तालुक्यात प्रथम क्रमांक

## उलवे शहर मनसे तर्फे सत्कार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** रायगड जिल्हा परिषद उलवे, केंद्र वहाळ, तालुका पनवेल येथील शाळेची विद्यार्थिनी कु. समिक्षा महेश मढवी हिने महाराष्ट्र राज्य परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता सातवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. समिक्षाने रायगड जिल्ह्यात चौथा क्रमांक, तर पनवेल तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून उलवे गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

समिक्षाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल उलवे शहरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून तिच्या घरी जाऊन गुणगौरव व सत्कार करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी समिक्षाचे



अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्कारप्रसंगी उलवे शहराचे माजी अध्यक्ष राहुल बाबुराव पाटील, पनवेल तालुका सचिव निर्दोष केशव गोंधळी, गव्हाण विभाग अध्यक्ष तुषार सुनील म्हात्रे तसेच गव्हाण विभाग उपाध्यक्ष बबलू जगन्नाथ पाटील उपस्थित होते.

समिक्षाने मिळवलेले हे यश तिच्या मेहनतीचे, जिद्दीचे आणि गुणवत्तेचे प्रतीक असून, तिच्या यशामुळे उलवे परिसरातील विद्यार्थी व पालकांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही गुणवत्ता आणि मोठी स्वप्ने पूर्ण करण्याची क्षमता आहे, हे समिक्षाने आपल्या यशातून सिद्ध केले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911